# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ ५२३/२०२०/सातारा

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १
दि.१४.१२.२०२३

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपील अधिकारी तथा |
| बाबू रामा रामोशी | नायब तहसिलदार, तहसिलदार कार्यालय पाटण, ता.पाटण, जि.सातारा | तहसिलदार, तहसिलदार कार्यालय पाटण,ता.पाटण, जि.सातारा |

<u>विवेचन</u>

अपिलार्थी यांनी दिनांक १८.१०.२०१९ रोजीच्या माहिती अर्जान्वये 'दि.०१.०१.१९६७ ते दि.३१.१२.१९६७ कालावधीतील १) सखाराम मारुती चौगुले वगैरे मौजे दिवशी बुद्रुक यांचे विरोधात मौजे काढणे येथील रामचंद्र बाबुराव मोशी वगैरे यांचे मध्ये मौजे दिवशी बु:, ता पाटण येथील बेरडकी या मिळकतीबाबत पाटण कोर्टात रे. दि. दावा नंबर १३.६७ चालविला गेला. या दाव्यात रामा कृष्णा रामोशी (पाटोळे) रा. दिवशी बुद्रुक व दुमलदार बहिरजीराव पाटणकर यांचे झालेल्या कबुली जबाबांची माहिती' मागितली होती. त्यासंदर्भात आयोगाकडे दाखल करण्यात आलेल्या द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दि. ३०.०८.२०२२ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

"तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जावर काहीही कार्यवाही न करून अधिनियमातील कलम ७(१) चा भंग केलेला असल्याने त्यांचे विरूध्द कलम २० मध्ये नमुद तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ ? याचा लेखी खुलासा आयोगाचे आदेश प्राप्त होताच तात्काळ सादर करावा"

प्रस्तुत प्रकरणी श्री.प्रशांत थोरात तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय पाटण, ता.पाटण, जि.सातारा यांनी उपरोक्त द्वितीय अपीलामध्ये पुढीलप्रमाणे खुलासा सादर केला आहे.

' अपिलार्थी यांनी सदरचा माहिती अर्ज केला त्यावेळी पाटण तालुक्यामध्ये १०७ ग्रामपंचायती निवडणुकीचे कामकाज युद्ध पातळीवर सुरू होते त्यामुळे अपिलार्थी यांना सदरची माहिती कार्यालयाशी संबंधित नसलेबाबत व या कार्यालयात उपलब्ध नसून मा. दिवाणी न्यायालयाकडे असल्याने त्यांच्याकडून उपलब्ध करून घेण्याबाबत तोंडी सांगण्यात आले होते. तसेच द्वितीय अपील सुनावणी वेली दिलेल्या निर्देशानुसार दिनांक ०१.०९.२०२२ रोजी सदरच्या माहितीचा शोधा अभिलेखामध्ये घेतला असता माहिती सापडत नसलेबाबत /उपलब्ध होत नसल्याबाबत कळवून मा. दिवाणी न्यायालयाकडे अर्ज करून सदरची माहिती उपलब्ध करून घेण्याबाबत लेखी कळविण्यात

आले आहे. तरी अपिलार्थी यांना हेतूपुरस्सर त्रास देण्याचा कोणताही हेतू नव्हता अथवा तशी कोणतीही कृती घडलेली नाही. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दंडात्मक व शिस्तभंगाची शिफारस करण्यात येऊ नये, अशी विनंती केली आहे'.

उपलब्ध अभिलेखावरुन स्पष्ट होते की, श्री.प्रशांत थोरात तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय पाटण, ता.पाटण, जि.सातारा यांनी विहित कालावधीत कोणतीही माहिती अथवा वस्तुस्थितीदर्शक उत्तर दिलेले नाही. त्याबाबत कोणतीही संयुक्तिक कारणमिमांसा दिलेली नसून पुरावादर्शक कागदपत्रे सादर केलेली नाहीत. त्यामुळे सदर प्रकरणामध्ये दिलेला खुलासा अमान्य करण्यात येत त्यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) च्या तरतुदींचे उल्लंघन केले असल्याने त्यांचे विरुध्द कलम २०(१) नुसार शास्तीची कार्यवाही करणे आवश्यक आहे. सबब, या प्रकरणी आयोग खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश.</u>**

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय पाटण, ता.पाटण, जि.सातारा श्री.प्रशांत थोरात यांचा खुलासा अमान्य करण्यात येत आहे. उपरोक्त विवेचनाच्या पार्श्वभूमीवर नमूद परिस्थितीचा विचार करता, त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(१) नुसार रु.२५०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) शास्तीची कारवाई करण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय पाटण, ता.पाटण, जि.सातारा यांनी श्री.प्रशांत थोरात तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय पाटण, ता.पाटण, जि.सातारा यांचे मासिक वेतनातून एकमुस्तपणे कपात करुन सदर रकमेचा भरणा "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही सदर आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत करावी व कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

प्रस्तुत द्वितीय अपील अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

**(समीर सहाय)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ पुणे.**

**जा. क्र.**

प्रति,

श्री.प्रशांत थोरात तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय पाटण, ता.पाटण, जि.सातारा

प्रत- जिल्हाधिकी, सातारा यांना उपरोक्त आदेशानुसार माहितीस्तव व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.